Mainstreaming Coastal and Marine Biodiversity Conservation into Production Sectors in Sindhudurg Coast in Maharashtra या GOI-UNDP-GEF बाह्य सहाय्यित प्रकल्पाकरीता निधी वितरण.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-१२.१७/प्र.क्र.०९/फ-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ३० डिसेंबर, २०१७.

वाचा :-

१. वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१७/प्र.क्र. ७५/अर्थ-३, दिनांक :- १८.०४.२०१७.
२. वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१७/प्र.क्र. ९४/अर्थ-३, दिनांक :- ३०.०६.२०१७.
३. केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल, मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक ४-४९/२०१७/डब्ल्यू दिनांक ३०.११.२०१७.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी त्यांचे पत्र क्रमांक कक्ष-१/सी/यो/प्र.क्र.१५/१७७२/१७-१८, दिनांक १४.१२.२०१७.
५. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- पुनर्वि-२०१७/२४०६/प्र.क्र. २९९/ब-१, दिनांक ३०.१२.२०१७.

प्रस्तावना :-

सन २०१७-१८ मध्ये केंद्र शासनाने Mainstreaming Coastal and Marine Biodiversity Conservation into Production Sectors in Sindhudurg Coast in Maharashtra या GOI-UNDP-GEF बाह्य सहाय्यित प्रकल्पाकरीता संदर्भीय पत्र क्र. ३ अन्वये रु. २४२.१३ लक्ष निधी वितरीत केलेला आहे. सदर प्रकल्प हा डिसेंबर, २०१७ मध्ये संपुष्टात येणार असल्यामुळे सदर रु. २४२.१३ लक्ष निधी लवकरात लवकर खर्च करण्याच्या अनुषंगाने अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्र. ४ च्या पत्रान्वयें सदर निधी पुनर्विनियोजनाव्दारे लेखाशिर्ष २४०६ वनीकरण व वन्यजीवन, ११० वन्यजीवनाचे संवर्धन, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, केंद्र पुरस्कृत योजना (००)(०३) वन्यजीवन व्यवस्थापन आणि संरक्षण (५० % केंद्रीय अनुदान) (२४०६ ०७८४) या लेखाशिर्षातून खर्च करण्यास प्रस्ताव सादर केला आहे.

शासन निर्णय-

सन २०१७-१८ मध्ये २४०६ ०७८४ या लेखाशिर्षातून मंजूर वार्षिक प्रर्वतन अहवालाची रक्कम ८१६.८९४ लक्ष निधी वजा जाता रु. ८३.१०६ लक्ष निधी व संदर्भीय क्र. ५ अन्वये २४०६ ०७८४ या लेखाशिर्षांत पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध होणारा रु. १५९.०२४ लक्ष निधी असा एकूण रु. २४२.१३ लक्ष निधी २४०६ ०७८४ या लेखाशिर्षाअंतर्गत Mainstreaming Coastal and Marine Biodiversity Conservation into Production Sectors in Sindhudurg Coast in Maharashtra या GOI-UNDP-GEF बाह्य सहाय्यित प्रकल्पाकरीता खर्च करण्यास खालील अटींवर शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अ) प्रस्तावित खर्च अनावर्ती व आवर्ती सर्वसाधारण घटक कार्यबाबींसाठी रु. २४२.१३ लक्ष लेखाशिर्ष मागणी क्रमांक सी-७, २४०६ वनीकरण व वन्यजीवन, ११० वन्यजीवनाचे संवर्धन, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, केंद्र पुरस्कृत योजना (००)(०३) वन्यजीवन व्यवस्थापन आणि संरक्षण (५० % केंद्रीय अनुदान) (२४०६ ०७८४) सन २०१७-१८ मध्ये अर्थसंकल्पित वितरण प्रणालीद्वारे उपलब्ध होणा-या अनुदानातून खर्च करण्यात यावा.

आ) शासन निर्णयान्वये वर नमूद केल्याप्रमाणे रु. २४२.१३ लक्ष निधी, संदर्भ क्रमांक ३ अन्वये केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल, मंत्रालय, नवी दिल्ली यांनी मान्यता दिलेल्या कार्यबाबींवर खर्च करण्यात यावा.

इ) मान्यता दिलेल्या खर्चाच्या तपशीलवार बाबी केंद्र शासनाने उपरोक्त संदर्भीय पत्रांमध्ये नमूद केल्या आहेत. सदर कामांना सक्षम प्राधिका-याची प्रशासकीय व तांत्रिक मान्यता असल्याखेरीज रक्कम खर्ची टाकण्यात येऊ नये.

ई) वितरीत केलेला निधी केंद्र शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार योजनेस विहीत केलेल्या मर्यादेत, प्रचलित नियमांच्या अधीन राहून व वित्त विभागाने वेळोवेळी विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तसेच केंद्र शासनाने प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यबाबींच्या अनुषंगाने खर्च करण्यात यावा.

उ) प्रस्तावित असलेल्या मोठया बांधकामासाठी शासनाने दिलेल्या सूचना आणि विहीत केलेली कार्यपद्धती अनुसरण्याची संबंधीत नियंत्रक/अंमलबजावणी अधिकारी यांची राहील. वित्त विभागाने निर्गमित केलेल्या विविध मार्गदर्शन सूचनांचे, वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१७/प्र.क्र. ७५/अर्थ-३, दिनांक :- १८.०४.२०१७ व क्रमांक :- अर्थसं-२०१७/प्र.क्र. ९४/अर्थ-३, दिनांक :- ३०.०६.२०१७ च्या परिपत्रकाचे काटेकोर पालन करावे.

२. हा शासन निर्णय नियोजन विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक :- २५०/१४७५, दिनांक २९.१२.२०१७ व वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक :-३४१/व्यय-१०, दिनांक :- ३०.१२.२०१७ अन्वये दिलेल्या मंजूरीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१०३१२०६३८६११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Deshbhratar

Digitally signed by Swapnil Deshbhratar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9add558653210cf44615291102f1bf143783e8403be64c06c7928e692d77c386, cn=Swapnil Deshbhratar
Date: 2018.01.03 12:13:23 +05'30'

(स्वप्निल देशभ्रतार)
विशेष कार्य अधिकारी,
महसूल व वन विभाग

प्रति,

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई.
५) महालेखापाल-१/२ (लेखापरीक्षण /लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
६) फ-३ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
७) फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ (निवडनस्ती).